

**KALEIDOSCOPE**

## 19th March 2021

# GPAT Result









पुढारी

# जी-पॅट परीक्षेत यशवंतराव भोसले फार्मसी कॉलेजचे यश

**सावंतवाडी : पुढारी वृत्तसेवा**

जीपॅट-२०२१ या फार्मसी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर आला असून यामध्ये सलग तिसऱ्या वर्षी यशवंतराव भोसले फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या प्रवेश परीक्षेत कॉलेजचे आठ विद्यार्थी यशस्वी झाले असून यामध्ये नागेश कलशेट्टी १९३, ऐश्वर्या माधव १९०, हिना काजरेकर १८०, राकेश बारबोले १५८, अस्मिता लोधी १५६, रोहन हरकुळकर १२५, हर्षदा सोनवडेकर १२३ व रविना सुतार ८७ गुणांचा समावेश आहे.

जी-पॅट परीक्षा फेब्रुवारी महिन्यात संपूर्ण भारतात विविध केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे औषध निर्माणशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीदेखील उपलब्ध होणार आहे.

या परीक्षेच्या सरावासाठी कॉलेजने स्वतंत्र मार्गदर्शन तासिका घेतल्या होत्या. विशेष तासिका तसेच सराव परीक्षा, अभ्यासाचे सुनियोजन व विद्यार्थ्यांची मेहनत या मुळेच हे यश प्राप्त झाल्याचे प्राचार्य डॉ. विजय जगताप यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष अच्युत सावंत-भोसले, प्राचार्य डॉ. विजय जगताप, परीक्षा समन्वयक प्रा.विनोद मुळे, प्रा. श्वेता शिरोडकर यांनी कौतुक केले.

नागेश कलशेट्टी, ऐश्वर्या माधव, हिना काजरेकर, राकेश बारबोले

अस्मिता लोधी, रोहन हरकुळकर, हर्षदा सोनवडेकर, रविना सुतार

The result of GPAT examination was declared on 19th March 2021 by National Testing Agency. In GPAT examination following students are qualified with marks out of 500.

| Sr. No. | Name of Student | Score (Out of 500) | All India Rank |
|---|---|---|---|
| 1 | Mr. Nagesh M. Kalshetti | 193 | 1404 |
| 2 | Ms. Aishwarya A. Madhav | 190 | 1545 |
| 3 | Ms. Heena G. Kajrekar | 180 | 2070 |
| 4 | Mr. Rakesh S. Barbole | 158 | 3902 |
| 5 | Ms. Asmita J. Lodhi | 156 | 4104 |
| 6 | Mr. Rohan R. Harkulkar | 125 | 8918 |
| 7 | Ms. Harshada S. Sonavdekar | 123 | 9426 |
| 8 | Ms. Ravina D. Sutar | 87 | 20631 |